**जळगाव शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय येथे बी.ए.एम.एस. प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थी प्रवेशास परवानगी देण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : एमईडी-२०१६/प्र.क्र.१८५/१६/शिक्षण-१**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन संकुल, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक रोड, मुंबई-४०० ००१.
दिनांक : ०१ ऑगस्ट, २०१९.

**वाचा :** १) समक्रमांकित शासन निर्णय, दि. ११ मे, २०१७.
२) आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. L.१४०१२/१९/२०१९-EP(IM१), दिनांक २२.०७.२०१९.

<u>प्रस्तावना</u> :

जळगाव येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमाचे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय सुरु करण्यास संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली आहे. शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० साठी केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्र.२ अन्वये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून परवानगी दिलेली आहे. सबब, सदर महाविद्यालयास १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० साठी परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय:-**</u>

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० साठी केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्र. २ अन्वये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमासाठी विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने सदर आयुर्वेद महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० साठी पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

<u>**अटी व शर्ती:-**</u>

१) शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव या आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार १०० एवढी राहील.

२) सदर अभ्यासक्रमास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्निकरण प्राप्त करुन घेण्यात यावे व तद्नंतर प्रवेश करण्यात यावेत.

३ राज्य शासन/ केंद्र शासन/ मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी.

४) केंद्र शासन, केंद्रीय भारतीय चिकित्सा परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे बंधनकारक राहील.

५) कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नये.

६) केंद्र शासनाने दिलेली परवानगी ही सन २०१९-२० वर्ष करीता असून तद्नंतर सदर परवानगीचे दरवर्षी नुतनीकरण करुन घेणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्याआधारे राज्य शासनाच्या परवानगीचे नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

७) सदर शासन निर्णय हा केंद्र शासनाने संदर्भाधीन क्र.२ अन्वये दिलेली परवानगी तसेच, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

**६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८०११५४६२३७४१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRINIVAS
PUNDALIKRAO
KOTWAL

Digitally signed by SHRINIVAS PUNDALIKRAO KOTWAL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=d32b061d22e577cf43207f6a86cadc4ce1798644845edd3b3fb5ef54c3051c62, postalCode=400001,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=30ec04f686f0e87515c68a42bc5df9353c8af939ef1a35539184495da3e943c6, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRINIVAS PUNDALIKRAO KOTWAL
Date: 2019.08.01 17:23:05 +05'30'

(डॉ.श्रीनिवास कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
९. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव.

१०.जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव.

११.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.

१२.जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव.

१३.सर्व अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालये.

१४.कार्यालयीन सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/ शुल्क नियामक प्राधिकरण, २०५, गर्व्हमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू) मुंबई-५१.

१५.सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.

१६.निवडनस्ती (शिक्षण-१).